International Research Journal of Humanities, Language and Literature
Volume -1 Issue-2 (November 2014) ISSN (P): 2349-1612

# महानुभा वय लीळाचरित्र, सूत्रपाठ व दृष्टांतपाठ यांचा अनुबंध

## The Relation of Mahanubhav Lilacharitra, Sutrapath and Drushtantpath

कु. पद्मिनी चंद्रशेखर दुरूगकर
Ku. Padmini Chandrashekhar Durugkar


## सारांश :

महानुभाव पंथ हा महाराष्ट्रात उद्याला आलेला प्रा चन काळातील पंथ असुन. या पंथाचे मुख्य लेखन हे लळाचरित्र तसेच सूत्रपाठ व दृष्टांतपाठ होय. याद्वारे जगाला अनेक गोष्टींचे मार्गदर्शन करून, जीवन जगण्याचे सार यातून प्रकट होत आहे. प्रस्तुत लेखामध्ये महानुभा वय लीळाचरित्र, सूत्रपाठ व दृष्टांतपाठ यांचा अनुबंध वषद केलेला आहे.


## प्रस्तावना :

महानुभाव पंथ हा महाराष्ट्रात उद्याला आलेला हिंदुधर्मातीलच एक पंथ कंवा संप्रदाय होय. या महानुभाव पंथाचा उदय बाराव्या-तेराव्या शतकात झालेला दिसून येतो. बाराव्या-तेराव्या शतकामध्ये महाराष्ट्रात देव गरी येथे यादवांची राजवट होती. मराठी साहित्य आ ण संस्कृतीच्या इतिहासाच्या संदर्भात यादवकाळ हा अत्यंत महत्वाचा मानला जातो.

## लीळाचरित्र, सूत्रवाङ्मय व सूत्रपाठ :

लीळाचरित्र हे परमेश्वर अवतार श्री चक्रधर स्वामींचे चरित्र म्हाइंभटांनी लहिले. त्यासाठी म्हाइंभटांनी खूप परिश्रम घेतले. पंथाचे आचार्य श्री नागदेवाचार्यांच्या आज्ञेने आ ण मार्गदर्शनानि त्यांनी ‘लीळाचरित्र‘ हा ग्रंथ पूर्ण केलेला दिसून येतो. आता त्या लीळाचरित्रातून ‘सूत्रपाठ‘ हा ग्रंथ व दृष्टान्तपाठ हा ग्रंथ निर्माण झालेले आहे.

लीळाचरित्राची नि र्मती करतांना म्हाइंभटांनी सर्व प्रथम आचार्य श्रीनागदेवाचार्यांजवळ बसून त्यांनी सां गतलेल्या लीळांचे लेखन केले, नंतर अंत्यत परिश्रम घेऊन श्रीचक्रधरस्वामी जेथे जेथे गेले, ज्या ज्या सद्भक्तांना त्यांनी उपदेश केला, त्या त्या ठिकाणी जाऊन, त्या सद्भक्तांना भेटून, त्यांच्याकडून इत्यंभूत ह ककत ऐकून, ती लहून घेतली. नंतर स्वामींच्या चरित्राची कच्ची प्रत तयार करून मग श्रीनागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाने कोणती वचने स्वामींच्या मुखीची असावीत, त्याची खात्री करून घेतली व त्याला ‘लीळाचरित्र१ या ग्रंथाचे रूप दिले. म्हाइंभटांनी स्वामींनी निरू पलेल्या सूत्रासहित

(वचनासहित) लीळाचरित्र लहिले. त्यामुळे लीळाचरित्रातून श्रीचक्रधरस्वामींच्या लीळाबरोबरच श्रीमुखीची तत्त्वज्ञानपर सूत्रे (वचने) ही आलेली आहेत.

श्रीनागदेवाचार्यांनी श्रीचक्रधरस्वामींनी निरू पलेल्या तत्त्वज्ञानाचे म्हणजेच ब्रम्ह वद्याशास्त्राचे ज्ञान इतर अनेक अनुसरलेल्या शष्यांना दिले. पण त्या सर्वांमध्ये के शराज उर्फ केशोबासांच्या ठिकाणी ते ज्ञान वशेषरूपाने रूजले होते. त्यांना या परमेश्वरी शास्त्राचा संबंध योग्य रीतीने लावण्याची उत्कट इच्छा निर्माण झाली. त्यासाठी त्यांनी सर्वप्रथम नागदेवाचार्यांची आज्ञा घेतली आ ण मग त्यांनी ‘लीळाचरित्रातून श्रीचक्रधरस्वामींची तत्त्वज्ञानपर व आचारधर्मपर जी वचने (सूत्रे) होती ती निवडून वेगळी काढली व आ ण श्रीनागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाने व सल्ल्याने त्यांचा अन्वय ला वला. म्हणजेच परस्पर त्या वचनांच्या संबंधांची जुळणी करून, त्याचा क्रम लावून, ज्या प्रकरणाची सूत्रे त्या प्रकरणात घातली. अशाप्रकारे सर्व प्रकरणे तयार करून त्याला ‘सूत्रपाठ१ या ग्रंथाचे स्वरूप दिले. के शराजव्यासांनी श्रीचक्रधरस्वामी निरू पत सूत्रवचनांची द्वादश प्रकरणात वभागणी करून शास्त्रान्वय ला वला. त्यालाच ‘सूत्रपाठ१ म्हणतात.

अशाप्रकारे लीळाचरित्रातील श्रीमुखीच्या तत्त्वज्ञानपर सूत्रांचे साक्षेपी संकलन व संपादन करून श्रीकेषोबासांनी ‘सूत्रपाठ१ हा ग्रंथ तयार केला. हे कार्य त्यांनी शके **1212-1213** (इ.स. **1290**) च्या सुमारास केले. म्हणजे ज्ञानेश्वरी निर्माण झाली त्या वेळेस केले.

## लीळाचरित्रातील श्रीचक्रधरस्वामींचे वचने व दृष्टांत यातून सूत्रपाठाची सध्दता:

परमेश्वर अवतार श्रीचक्रधरस्वामींचे चरित्र म्हणजे लीळाचरित्र हा ग्रंथ स्मरण भक्तिचा व आठवणींचा एक सुंदर भावानुबंध आहे. तो एक भावनांचा, ऋणानुबंधांचा उत्कट अ वष्कार आहे. असे आपल्याला दिसून येते.

म्हाइंभट ल खत ‘लीळाचरित्र१ हा अनन्यसाधारण असा ग्रंथ आहे. हा ग्रंथ अनेक दृष्टींनी महत्वाचा असून वै शष्ट्यपूर्ण आहे. असे म्हणण्याचे कारण म्हणजे, ‘लीळाचरित्र१ या ग्रंथामध्ये श्रीचक्रधरस्वामींचे संपूर्ण चरित्र त्यांच्या लीळा, आठवणी व आख्यायिका या रूपाने आले आहे. तसेच या ग्रंथातील संपूर्ण लीळा या गद्यात सां गतल्या आहेत. त्यामुळे त्यावेळच्या मराठी भाषेचे व्यावहारीक रूप आपल्याला कळते. त्यावेळच्या भाषेचे वै शष्ट्य आपल्याला कळते. तसेच या ग्रंथातून त्यावेळच्या समाजाचे चत्र आपल्या डोळयासमोर उभे राहते. त्यावेळच्या चालीरीती, रूढी, परंपरा, खाद्यपदार्थ, आ र्थक व्यवहार, धा र्मक श्रद्धा इ. आपल्याला कळतात. अशा या अद् वतीय ग्रंथामध्ये श्रीचक्रधरस्वामींच्या चरित्राबरोबरच त्यांच्या तोंडून निघालेले तात्विक वचने, सूत्रे कंवा वचारही आहेत. हे वचार सामान्य

International Research Journal of Humanities, Language and Literature
Volume -1 Issue-2 (November 2014) ISSN (P): 2349-1612

जनतेला समजावे, म्हणून मायबो लत सां गतलेले अनेक 'दृष्टांत' ही आहेत. ही वचने (सूत्रे) व दृष्टांत संपूर्ण लीळाचरित्रभर वखूरलेली आहेत. ही वचने व दृष्टांत श्रीकेसोबांसांनी लीळाचरित्रातून वेगळी काढली आ ण 'सूत्रपाठ' व 'दृष्टांतपाठ' असे दोन तत्त्वज्ञानपर ग्रंथ त्यांनी संकलीत केले. हे दोन ग्रंथ मराठी साहित्यातील अद् वतीय असे ग्रंथ आहेत. श्रीकेसोबासांनी लीळाचरित्रातील श्रीचक्रधरस्वामींची वचने व दृष्टांत वेगळे काढून 'सूत्रपाठ' हा ग्रंथ सध्द केला आहे. त्यांनी 'सूत्रपाठ' हा ग्रंथ निर्माण करण्यासाठी खूप परिश्रम घेतले. सूत्रपाठ या ग्रंथाचे महत्व लक्षात घेतल्यावर श्रीनागदेवाचार्यांनी तर 'योग्य कार्य केले' असे समाधान व्यक्त केले. कारण सूत्रपाठातील प्रत्येक सूत्रांतून श्रीचक्रधरस्वामींचे वचार व तत्त्वज्ञान व्यक्त झाले आहे.

## सूत्रपाठातून सध्द झालेले ग्रंथ व त्यांचे स्थान :

महानुभाव पंथामध्ये सूत्रपाठ हा ग्रंथ 'वचनरूप परमेश्वर' आहे. या ग्रंथाची जपवणूक पंथीय मंडळींनी फार आत्मीयतेने व निष्ठापूर्वक केलेली आहे. साध्या, सरळ पण अत्यंत गहन अर्थानी भरलेल्या श्रीमुखींच्या वाक्यांनी, वचनांनी 'सूत्रपाठ' हा ग्रंथ तयार झाला आहे. त्यामुळे 'सूत्रपाठ' हा ग्रंथ महानुभाव पं थयांना श्रुतितुल्य वंदनीय आहे. त्यामुळे सूत्रपाठावर अनेक ग्रंथ निर्माण झाले. केसोबासांनी शके **1212-1213** च्या सुमारास सूत्रपाठ हा ग्रंथ निर्माण केला. या सूत्रपाठ ग्रंथाप्रमाणेच दृष्टांतपाठ या ग्रंथाचेही संकलन केसोबासांनी केले. त्यानी सूत्रपाठा नंतर लगेच दृष्टांतपाठ हा ग्रंथ निर्माण केला. लीळाचरित्रामध्ये श्रीचक्रधरस्वामी सूत्र सांगतांना त्या सूत्रांतील आशय समजावा म्हणून एखादा दृष्टांत सांगत असत. त्याच दृष्टांताचा संग्रह म्हणजेच 'दृष्टांतपाठ' हा ग्रंथ होय. मात्र दृष्टांतपाठ हे केवळ संकलनच नाही, तर प्रत्येक दृष्टांतावर त्यांनी आपले भाष्यही केले आहे.

केसोबासांनी सूत्रपाठ हा ग्रंथ निर्माण केल्यानंतर शंभर-सव्वाशे वर्षाच्या आतच त्यावर अनेक भाष्यग्रंथ तयार झाले. सूत्रपाठ या ग्रंथाचे अर्थ व उद्देश स्पष्ट करून सांगणारे 'प्रकरणवश'(परशरामबास), 'हेतुस्थळ';न्यायबास), आ ण 'निरूक्तिषेष'(पं. भीष्माचार्य), 'लक्षणरत्नाकर' (आनेराज), 'पंचवार्तिक', 'सरवळे' असे अनेक ग्रंथ निर्माण झाले. तसेच या काळात गुर्जर शवव्यास व सध्दांते हरिव्यास यांनी तिन्ही स्थळांची कायमची बांधणी केली. हेच भाष्यग्रंथ होत. त्याचप्रमाणे नंतरच्या काळात सूत्रांचा ग र्भतार्थ स्पष्ट करणारे 'ला पका', 'प्रमेय', 'व्याख्याने', 'गुढे', 'पट' असे पुष्कळ ग्रंथ निर्माण झाले. त्यामुळे सूत्रपाठ हा ग्रंथ पुढील सर्व ग्रंथाचा पाया ठरला.

या सर्व ग्रंथांचे मराठी वाङ्मयातील स्थान अनन्यसाधारण असे आहे. मराठी भाषेचे काव्यग्रंथातून न आढळणारे रूप आपल्याला या ग्रंथातून पहायला मळते. तसेच मराठी भाषेचे

International Research Journal of Humanities, Language and Literature
Volume -1 Issue-2 (November 2014) ISSN (P): 2349-1612

तर्कनिष्ठ स्वरूपही या महानुभावीय भाष्यग्रंथांतून स्पष्टपणे दिसते. महानुभावीय भाष्य ग्रंथकारांनी प्राचीन काळात मराठी साहित्याची ही तात्विक बाजू उत्कृष्ट पणे सांभाळलेली आहे. भाषा मराठी परंतु रीती संस्कृत असे या भाष्यग्रंथांचे स्वरूप दिसून येते. मराठी साहित्याला व महानुभावीय साहित्याला या ग्रंथांनी समृध्द केलेले आहे. त्यामुळे या ग्रंथांचे महानुभावीय वाङ्यातील स्थान अद् वतीय असे आहे.

## सूत्रपाठाचे वाङ्मयीन स्थान :

परमेश्वरी अवतार श्रीचक्रधरस्वामींच्या मुखातून निघालेल्या गहनीय तात्विक वचारांचा ग्रंथ म्हणजे ‘सूत्रपाठ’ हा ग्रंथ होय. प्रत्यक्ष परमेश्वराच्या मुखातून हे ज्ञान प्रकट झाले आहे. त्यामुळे महानुभाव पंथात या ग्रंथाला परमेश्वर स्वरूप समजल्या जाते.

'सूत्रपाठ’ या ग्रंथाचे मराठी वाङ्मयातील स्थान तर अनन्यसाधारण आहे. वाङ्मयीन दृष्टींनी वचार केला तर सूत्रपाठाचे मराठी वाङ्मयातील स्थान अद् वतीय असे आहे. कारण सूत्रपाठ हा ग्रंथ वाङ्मयीनदृष्ट्या अतिशय उत्कृष्ट झालेला आहे. सुरूवातीपासून शेवटपर्यंत सूत्रबध्द असा हा एकच ग्रंथ आहे. या सूत्रपाठ ग्रंथाचा वषय तात्विक आहे. परंतु त्यातील अनेक सूत्रे वाङ्मयीन दृष्टयासुध्दा सुंदर आहेत. प्रत्येक सूत्रातील अल्पाक्षरत्व व तरीही त्यातील आशयघनता या गुणांनी सूत्रपाठ हा ग्रंथ परिपूर्ण आहे. त्यातील प्रत्येक शब्दांची योजना ही मा र्मक व आशयसंपन्न आहे. अगदी थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थ सांगण्याचे सामथ्र्य या सूत्रांच्या ठिकाणी आहे. सूत्रपाठातील सूत्रांच्या या अंगभूतगुणधर्मामुळे ‘सूत्रपाठ१ ला एक निराळेच तेज प्राप्त झालेले दिसून येते. यातील सगळी सूत्रे ही तात्विक असून दे खल त्यातील वलक्षण शब्दयोजनेमुळे ती अतिशय परिणामकारक झालेली आहेत. काही सूत्रातील दृष्टांतयोजनाही अतिशय सुंदर आहे. काही ठिकाणी ही सूत्रे वस्तारित स्वरूपाची असली तरी अत्यल्प व वेचक शब्दांत पुष्कळ अर्थ सांगणारी सूत्रेही खूप आहेत. काही सूत्रांमध्ये तर परस्पर वरोधभावही दिसून येतो. सूत्रपाठ या ग्रंथातील सूत्रे बारकाईने वाचली म्हणजे आपल्याला त्याचे निरनिराळे प्रकार दिसून येतात. या सगळया सूत्रांवरून त्यातील वलक्षण परिणामकारकता व शब्दसौदर्य कळते. खरोखरच सूत्रपाठातील प्रत्येक सूत्रातून स्वामींचे गहनीय थोर वचार तर व्यक्त होतातच पण मनाची पकड घेऊन त्याला अंतर्मुख करण्याचे सामथ्र्यही या सर्व सूत्रांमध्ये आहे. असा हा सूत्रपाठ ग्रंथ अमोल असा आहे. त्यामुळे सूत्रपाठाचे वाङ्मयीन स्थान अद् वतीय व अनन्यसाधारण असे आहे.

International Research Journal of Humanities, Language and Literature
Volume -1 Issue-2 (November 2014) ISSN (P): 2349-1612

## सूत्रपाठातील भाषा :

खरे तर सूत्रपाठ हा ग्रंथ तत्त्वज्ञानाचा तात्विक गहनीय वचारांचा ग्रंथ आहे. पण सूत्रपाठाचा वषय हा तात्विक असला तरी त्यातील अनेक सूत्रे वाङ्मयीन दृष्टया सुध्दा अतिशय सुंदर आहेत. सूत्रपाठातील प्रत्येक सूत्रातून स्वामींचे तत्त्वज्ञान व्यक्त झोलेले आहे. सूत्र हे अत्यंत लहान वाक्याचे असते. सूत्रपाठातील कत्येक वचने ही अतिशय लहान-लहान शब्दांनी मळून तयार झालेली आहेत. सूत्रपाठ हा ग्रंथ महानुभाव तत्त्वज्ञानाचा पाया आहे. त्यामुळे सूत्रपाठातील कुठल्याही सूत्रामध्ये अलंकारीत भाषा कोठेही आलेली दिसत नाही. अतिशय साध्या, सरळ, परंतु मा र्मक व आशयसंपन्न वाक्यांनी सूत्रपाठ हा ग्रंथ निर्माण झालेला आहे. सूत्रपाठातील भाषेमुळे आपल्याला प्राचीन मराठीचे तात्विक रूप पहायला मळते. कुठेही शृंगारीकता नाही, अलंकारिकता नाही. पण तरीही प्रत्येक सूत्र अतिषय सूंदर व परिणाम कारक झालेले आहे. साधी, सरळ, सोपी भाषा परंतु प्रत्येक सूत्रात गहन अर्थ भरलेला आहे. श्रीचक्रधरस्वामींनी आपले वचार, तत्त्वज्ञान सामान्यांना समजण्यासाठी मराठी भाषेचा अवलंब केला. त्यांनी संस्कृत भाषेचा वापर न करता मायबोली मराठीचा वापर केला. आपले तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनतेला समजण्यासाठी साध्या, सरळ, पण मा र्मक व गहन वचनामध्ये आपले तत्त्वज्ञान व वचार व्यक्त केले. श्रीकेसोबासानीं ही सूत्रे लीळाचरित्रातून निवडली. पण त्यांनी श्रीमुखीच्या वाक्याबदली स्वतःचे एकही वाक्य टाकले नाही. हे त्यांच्या हातून घडने शक्यच नव्हते. केसोबासांनी श्रीनागदेवाचार्यांच्याच संमतीने व त्यांच्याच मार्गदर्शनाखालीच लीळाचरित्रातील स्वामीच्या मुखातील वचने निवडून काढली होती व त्यांचे वर्गीकरण करून त्या वचनांचा परस्परांषी अन्वय लावला होता. केसोबास हे अतिशय श्रध्दाशील व निष्ठावान भक्त होते. त्यामुळे स्वामींची वचने त्यांनी जशी च्या तशी घेतली होती आ ण श्रीनागदेवाचार्य हे तर सर्वज्ञांचे अनन्यसेवकच होते. त्यामुळे त्यांनी श्रीमुखीची सूत्रे कडकपणे तपासून घेतली होती. सूत्रपाठातील वचने ही प्रत्यक्ष परमेश्वराची असल्याने त्यात बदल होणे शक्यच नव्हते. त्यामुळे सूत्रपाठातील भाषा ही तात्विक स्वरूपाची आहे. पण तरीही शब्दयोजनेतील मतव्यय कंवा अगदी थोडक्यात; कमी शब्दात पुष्कळ अर्थ सांगण्याचे सामर्थ या सूत्रामध्ये आहे. त्यामुळे महानुभावीय गद्य वाङ्मयामध्ये सूत्रपाठ हा तत्त्वज्ञानपर ग्रंथ अगदी शोभून दिसते. सूत्रपाठातील सूत्रात भाषेचे शास्त्रीय वळण दिसते. कारण ‘सूत्रपाठ’ हा निखळ तात्विक स्वरूपाचा ग्रंथ आहे. सूत्रांची भाषा शास्त्रीय वळणाची असली तरी त्यातील गोडी वेगळीच आहे. मनाला स्पर्श करणारी ही भाशाशैली आहे. मनाची पकड घेऊन मनाला अंतमुर्ख करण्याचे सामर्थ या भाषेमध्ये आहे. श्रीचक्रधरस्वामींच्या वाणीमध्ये एक जिवंतपणा होता. तो आपल्याला त्यात जाणवतो.

यावरून असे लक्षात येते, श्रीचक्रधरस्वामींची भाषा ही सूत्रमय असली तरी ती फार साधी, सोपी, सरळ व सुटसुटीत आहे. या सूत्रमय भाषेचे प्रासादिक स्वरूप, जिवोध्दारणाच्या हेतूमुळे अ धकच करूणेचे, जिव्हाळयाचे झाले आहे. स्त्रीशुद्रांना, आबालवृध्दांना आ ण जनसामान्य लोकांना समजावी म्हणून ते मराठी सुलभ बोलत असत. श्रीचक्रधरस्वामींची परावाणी ही जिवंत स्वरूपाची झळझळीत, तेजस्वी आ ण आत्मप्रत्ययातूनच स्फूरलेली होती.

## लीळाचरित्र व सूत्रपाठाचा अन्वय :

लीळाचरित्र व सूत्रपाठ या दोन्ही ग्रंथाचा अन्वय म्हणजे संबंध खूप जवळचा आहे. असे आपल्याला दिसून येते. लीळाचरित्रात स्वामींच्या चरित्राबरोबरच त्यांनी वेळोवेळी कथन केलेले वचारही आलेले आहेत. सुमारे **1500** लीळांमध्ये वखुरलेल्या या वचारांचे संकलन श्रीकेसोबासांनि केले. त्यालाच 'सूत्रपाठ' असे संबोधण्यात येते. लीळाचरित्रात श्रीचक्रधरस्वामींचे संपूर्ण जीवन चरित्र येते, तर सूत्रपाठात त्यांनी प्रतिपादन केलेले तत्त्वज्ञान सूत्ररूपाने येते. लीळाचरित्रातून त्याचा जीवनपरिचय होतो. तर सूपाठातून त्यांचे मूल्यवान तत्त्वज्ञान, वचार कळतात. हे वचार त्यांनी सर्वसामान्यांचा आ ण स्त्रीशूद्रांचा उध्दार होण्यासाठी सां गतलेले दिसून येतात.

त्याचप्रमाणे श्रीम्हाइंभटांनी सूत्रांसहीत व दृष्टांतासहीतच लीळाचरित्र या ग्रंथाची नि र्मती केली. त्यांनी ज्या लीळा संक लत केल्या त्यामध्ये स्वामींचे तत्त्वज्ञानपर सूत्रेही आलेली आहेत. कारण स्वामी अनेकांना उपदेश वचने निरूपण करीत होते. ती वचने समजावी म्हणून लोकभाषेतील म्हणजेच व्यवहारातील साधे, सोपे दृष्टांतही सांगत होते. हे दृष्टांत कथेसारखे असत. त्यामुळे भक्तांना स्वामींचे वचार लवकर आकलन होत असत. तसेच लीळाचरित्र हा ग्रंथ अनेक दृष्टींनी महत्वाचा असल्याने त्यातून व वध वषयाचे ज्ञान होते. जसे, भाषा, समाजदर्शन, व्यक्तिदर्शन, सांस्कृतिक, आ र्थक, सामाजिक घडामोडी, व्यापार, नाणीगाणी, कपडे, अन्नपदार्थ अशा सगळयांचे दर्शन लीळाचरित्रातून घडते. त्यामुळे श्रीचक्रधरस्वामींचे तत्त्वज्ञान आ ण मौ लक वचार समजण्यासाठी त्यांच्या वचनांचे एकत्रितरित्या संकलन होणे फार महत्वाचे होते. तसेच महानुभावीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास होण्यासाठी हे फार आवश्यक होते. स्वामींची ही तत्त्वज्ञानपर सूत्रे संपूर्ण लीळाचरित्रभर वखूरलेली होती. तेव्हा ही सूत्रे संक लत करण्याचे कार्य श्रीकेसोबासांसारख्या निष्ठावान, वद्वान पं डताने केले. केसोबासासारख्या पं डताकडून सूत्रपाठ निर्माण होणे हे महानुभाव पंथाच्या तात्विक बैठकीसाठी आवष्यक होते. कारण याच सूत्रपाठावरून पुढे अनेक भाष्ये, महाभाष्ये निर्माण झाली. या सूत्रपाठ ग्रंथाचे महत्व लक्षात घेतल्यावर श्रीनागदेवाचार्यांनी, "हे शास्त्र माझ्या माघारी जाणार नाही, असे योग्य कार्य तू केले आहेस'असे समाधान

व्यक्त केले होते. यावरून आपल्याला असे लक्षात येते की, लीळाचरित्र हा ग्रंथ सूत्रपाठ या ग्रंथाचे मूळ आहे. सूत्रपाठाची नि र्मती लीळाचरित्रातून झालेली आहे. दोन्ही ग्रंथांचे महत्व व वै शष्ट्य जरी वेगवेगळी असली तरी हे ग्रंथ एकमेकांत गुंतलेले आहे व एकमेकांना पूरक आहेत. त्यामुळे लीळाचरित्र व सूत्रपाठाचा अन्वय फार जवळचा आहे.

## दृष्टांतपाठ व सूत्रपाठ आ ण दृष्टांतपाठाचे व सूत्रपाठाचे स्थान:

दृष्टांतपाठ व सूत्रपाठ या दोन्ही ग्रंथांचा ही फार जवळचा संबंध आहे. असे म्हणण्याचे कारण असे की, लीळाचरित्रात श्रीचक्रधरस्वामी आपली उपदेषवचने (सूत्रे) निरूपण करतांना कंवा सांगतांना त्या वचनांतील आशय समजावा म्हणून एखादा दृष्टांत सांगत असत. म्हणजेच सूत्रांचे आकलन सूलभरित्या होण्यासाठी दृष्टांतांची नि र्मती झालेली आहे असे दिसून येते.

या दोन्ही ग्रंथाचे मूळ 'लीळाचरित्र' हा ग्रंथ आहे. श्रीम्हाइंभट ल खत 'लीळाचरित्र' या ग्रंथातून श्रीकेसोबासांनी श्रीचक्रधरस्वामींच्या श्रीमुखीची तत्त्वज्ञान पूरक व आचरपूरक सूत्रे जशी एकत्रित केली व 'सूत्रपाठ' हा ग्रंथ सध्द केला. तसाच त्यांनी लीळाचरित्रातून स्वामींच्या मुखचे दृष्टांत निवडून व ते एकत्रित करून 'दृष्टांतपाठ' हाही ग्रंथ संक लत केला. यावरून असे दिसते की, लीळाचरित्रातूनच सूत्रपाठ व दृष्टांतपाठाची नि र्मती झालेली आहे. म्हणून लीळाचरित्र, सूत्रपाठ व दृष्टांतपाठ यांचा अन्वय म्हणजे संबंध फार जवळचा आहे.

सूत्रपाठाप्रमाणेच दृष्टांतपाठाचेही संकलन केसोबासांनी केले. 'दृष्टांतपाठ' हा केसोबासांचा ग्रंथ संकलनात्मक व टीकात्मक स्वरूपाचा आहे. म्हणजेच दृष्टांतपाठ हे केवळ संकलनच नाही, तर प्रत्येक दृष्टांतावर त्यांनी आपले भाष्यही केले आहे. म्हणजेच दृष्टांतपाठाचे कर्तृत्व दुहेरी आहे असे दिसून येते.

दृष्टांतपाठातील प्रत्येक दृष्टांत सूत्र, दृष्टांत व दाष्टान्तिक अशा स्वरूपात मांडलेला आहे. आधी स्वामींचे सूत्र, त्यानंतर त्या सूत्राच्या अनुषंगाने येणारा दृष्टांत आ ण नंतर सूत्र व दृष्टांत यांचा तात्विक संबंध जोडणारे दाष्टान्तिक. प्रत्येक सूत्र हे स्वामींचे असून. दृष्टांतही त्यांनीच सां गतले आहे. दाष्टान्तिक मात्र केसोबासांचे आहे. म्हणजेच असे म्हणता येईल की, लीळाचरित्रात श्रीचक्रधरस्वामींनी तत्त्व कंवा वचन स्पष्टीकरणार्थ वेळोवेळी सां गतलेले दृष्टान्त 'लीळाचरित्रा' तून वेगळे काढून जसे संक लत केले आहेत तसेच त्या दृष्टांतावर दाष्टान्तिकरूपाने टीकाही केसोबासांनी लहिली आहे. मूळ सूत्र व त्यावरील दृष्टांत श्रीचक्रधरस्वामींचा आ ण त्यावरून निष्कर्षरूपाने सां गतलेले दाष्टांन्तिक तेवढे केसोबासांचे आहे. याप्रमाणे 'दृष्टांतपाठ' या ग्रंथाची रचना दुहेरी स्वरूपाची झालेली आहे. तसेच लीळाचरित्र या ग्रंथामध्ये तर काही ठिकाणी फक्त दृष्टांताचाच

International Research Journal of Humanities, Language and Literature
Volume -1 Issue-2 (November 2014) ISSN (P): 2349-1612

उल्लेख येतो. पूर्ण स्वरूपात दृष्टांत येत नाहीत. असे दृष्टांतही केसोबासांनी पूर्ण केले आहेत. म्हणजे दृष्टांतपाठाची रचना ही सं मश्र स्वरूपाची दिसून येते.

या वषयी डॉ.शं.गो. तुळपुळे यांचा अ भप्राय पाहण्यासारख आहे. ते म्हणतात, "दृष्टांत पाठातील प्रत्यक्ष दृष्टांताचा पुष्कळसा भाग चक्रधरोक्त असला तरी तो म्हाइंभटांनी 'लीळाचरित्रा' त समा वष्ट न केल्याने के षराजांना तो स्वतः आठवून लहावा लागत आहे. कारण पुष्कळ ठिकाणी जेथे 'लीळाचरित्र' "मग सर्वज्ञें (अमुक) दृष्टांत निरू पला" इतकेच म्हणून थांबते, तेथे के षराज आपल्या ग्रंथात तो समग्र दृष्टान्त देतात. याचा आणखी अर्थ असा की, 'दृष्टान्तपाठा' तील दृष्टान्त हा भाग की जो चक्रधरांचा म्हणून समजला जातो तो सर्वस्वी तसा नसून त्यात के षराजांचाही काही वाटा आहे. अर्थात हे सर्वच दृष्टान्त चक्रधरांनी प्रत्यक्षात दिलेले असल्याने ते त्यांचेच होत हे खरे. पण त्यांची मांडणी कंवा संपूर्ण शब्द योजनाही प्रत्येक ठिकाणी त्यांचीच आहे असे म्हणता येत नाही, इतकेच"[1] (पृ.क्र. **179)**

डॉ. शं.गो. तुळपुळेचा हा अ भप्राय पाहिला क दृष्टांतपाठाची रचना कशी सं मश्र स्वरूपाची आहे ते कळते. त्यांनी थोडक्यात आपल्याला हे समजावून सां गतलेले आहे. यावरून आपल्याला असे म्हणता येईल की, श्रीचक्रधरस्वामींचे मूळ सूत्र, त्यावर केसोबासांचे दाष्र्टांतिक आ ण प्रत्यक्ष दृष्टांत हा दोघांचा मळून आहे असे वाटते. तसेच श्रीकेसोबासांनी दृष्टांतपाठाचे एक 'लाप णक' ही स्वतः तयार केले आहे. एका दृष्टीने ही 'लाप णका' म्हणजे 'दृष्टांतपाठा' ची वषयानुक्रम णकाच म्हणता येईल. केसोबांसांच्या मूळ ग्रंथाचे समग्र दर्शन ही 'लाप णक' संक्षेपाने घड वते. तसेच केसोबासांनी 'दृष्टांतपाठ' या ग्रंथाचे 'दृष्टांतस्त्रोत्रम्' या नावाने संस्कृत रचनाही केली आहे. पुढील काळात दृष्टांत पाठावर ववरणात्मक अनेक ग्रंथ निर्माण झाले. त्यामध्ये **16** व्या शतकातील वश्वनाथबासांचा 'दृष्टांतस्थळ' हा टीपग्रंथ वशेष महत्वाचा आहे.

श्रीचक्रधरस्वामी हे आपल्या शष्यांना, भक्तजनांना ब्रम्ह वद्याषास्त्राचे निरूपण करीत असत, त्यांच्या पुढील श्रोते हे बाल नव्हते तर प्रौढ होते. अषा प्रौढ जिज्ञासूंना तत्त्व पटवून देतांना व्यवहारातील घटना, प्रसंग वा दाखले देऊन त्यांचे शंकानिरसण करणे ही श्रीचक्रधरस्वामींची निरूपण पध्दती होती. हे दृष्टांत सांगण्याची स्थाने प्रामुख्याने पैठण, बेलापूर, डोमेग्राम, खडकुली, एलापूर, हिरवळी व संगणापूर इत्यादी होते. **114** दृष्टांतापैकी साधारणपणे अर्धे दृष्टांत हे भटोबास म्हणजेच श्रीनादेवाचार्य, महदाइसा, रामदेव व बाइसा या प्रमुख षष्यांना सां गतलेले दिसून येतात. दृष्टांताचे एकूण प्रमुख सहा प्रकार आहेत. ते सहाही प्रकार 'लक्षणरत्नाकर' या ग्रंथामध्ये सां गतलेले आहेत.

दृष्टांतपाठात एकूण **114** दृष्टांत येतात. यातील प्रत्येक दृष्टांत आपापल्यापरीने अर्थपूर्ण आहे. ती छोटीषी एक बोधगर्भ कथाच आहे. श्रीचक्रधरस्वामींनी निरू पलेल्या प्रत्येक दृष्टांतामध्ये आपल्याला तत्कालीन समाजाचे दर्षन होते. अत्यंत साध्या, सरळ शब्दांत सां गतलेल्या कथांमुळे मूळ सूत्राचे बीज उकलण्यास मदत होते व

International Research Journal of Humanities, Language and Literature
Volume -1 Issue-2 (November 2014) ISSN (P): 2349-1612

त्यातून सूत्राचा उद्देश लक्षात येतो. केसोबासांनी हा सूत्राचा उद्देश द्राष्टान्तिकात अ धक स्पष्ट करून दाख वला आहे. दृष्टांतात येणाऱ्या कथांमधील प्रतिमा या इतक्या समाजमान्य आहेत की त्यातील आशय लक्षात आल्यावर ती कथा आपल्याला आपल्या जीवनानुभवातीलच वाटते. लहान, आटोपशीर, अर्थपूर्ण, वाक्यांमुळे तर त्यातील आशयघनता अ धक रोचक झालेली आहे. यावरून असे म्हणता येईल की, दृष्टांतपाठातील सूत्र व दाष्टान्तिक या भागांमध्ये तत्त्वदर्शन दिसून येते, तर दृष्टांतभागामध्ये आपल्याला समाज दर्शन घडते. तत्कालीन समाजजीवनाचे हे दर्शन अर्थात मुद्दाम घड वलेले नाही आहे, तर ते आपल्याला सहजपणे घडते. तसेच श्रीचक्रधरस्वामींच्या दृष्टांतपाठातील प्रतिमासृष्टीही तिच्या वै चत्र्यामुळे अतिशय वलोभनीय वाटतात.

ही प्रतिमासृष्टी सांकेतिक नाही आहे. तर ती व्यावहारिक अनुभवातील आहे. ती पाहिली की आपल्याला हे दृष्टांत देणाऱ्या श्रीचक्रधरस्वामींचे लौ कक सृष्टीचे अतिशय सूक्ष्म अवलोकन व मानवी स्वभावाचे अचूक ज्ञान यांचा चांगला प्रत्यय येतो.

दृष्टांतपाठामध्ये शब्दांच्या संपत्तीचे वैभव वाखाणण्यासारखे आहे. श्रीचक्रधरस्वामींचा वावर समाजातील सर्वच थरांमध्ये असल्यामुळे त्यांच्या बोलण्यात अनेक प्रकारचे शब्द आढळून येतात. म्हणूनच त्यातील शब्दसंग्रह समृध्द आहे. काही शब्द तर पाहण्यासारखे आहेत. उदाहरनार्थ - हिऱ्याचे काम करणारा (ख णकार), माणसे धरूण त्यांची वक्री करणारा (बांदकरी), वैद्य, खाती (लोहार), पाषाणाची परिक्षा करणारे (पाथरवट), रसापासून गुळ काढणारे (गुळहारिया) असे अनेक व्यावसायिक शब्द आहेत. तसेच सेंजीयासाइजीया, आंगीटोपटे, गोरागोमटा, मोडीतोडी, सोएहीधाएरी, असे अनेक जोडशब्दही पहावयास मळतात. काही वरूध्दार्थी शब्दांची रेलचेलही दिसून येते. उदा. ऐल-पैल, ऐला ड-पैलाडी, रिगणे-निगणे, वोखटे-गोनटे, भरे-रिचवे, लांब-लहान इत्यादि. याचप्रमाणे दृष्टांतपाठात वाक्प्रचार तर सर्वत्र आहेत. गद्य ही व्यवहाराची भाषा असल्यामुळे वै वध्यपूर्ण वाक्प्रचार असणे साहजिकच आहे. पुढील वाक्प्रचार बघण्यासारखे आहेत.

उदाहरणार्थ - आलेयापालेया पोट भरणे, खंति करणे, गहाण ठेवणे, घरवात करणे, जिव्हे कुष्ट लागणे, तोंड देणे, तोंड पळ वणे, दारवंटी राखणे, पाठिसी घालणे, पान्हा येणे, इत्यादी. दृष्टांतपाठ हा ग्रंथ यादवकालीन मराठी गद्याचा प्रातिनि धक आहे. यादवकाळातील मराठी गद्यांचे स्वरूप आपल्याला लौ कक आ ण शास्त्रीय अशा दुहेरी अंगाने वक सत झालेले दिसते. दृष्टांतपाठातील सूत्रात भाषेचे शास्त्रीय वळण दिसून येते. कारण सूत्रपाठ हा ग्रंथ निखळ तात्विक स्वरूपाचा ग्रंथ आहे. तसेच 'दृष्टांत' हे लीळाचरित्रातून निवडून काढल्यामुळे त्यात लीळाचरित्रातील लौकीक भाषेचे वळण स्पष्टपणे दिसून येते. त्यावर स्पष्टीकरणासाठी स्वतः केसोबासांनी लहिलेल्या दाष्टांतिकात त्यांचे स्वतःचे असे बुध्दीप्रामान्यवादी शास्त्रीय पं डती वळण दिसून येते. यावरून असे दिसते की एकंदर 'दृष्टांतपाठा' चे स्वरूप अशा तिहेरी गुंफणीने गुंफले आहे.

International Research Journal of Humanities, Language and Literature
Volume -1 Issue-2 (November 2014) ISSN (P): 2349-1612

यावरिल श्री.शं.गो. तुळपुळे यांचा अ भप्राय पाहण्यासारखा आहे. ते म्हणतात की, 'भाषादृष्टया' 'दृष्टांतपाठा' चे स्वरूप सं मश्र आहे. त्यातील सूत्रांची भाषा शास्त्रीय, दृष्टांताची भाषा लौ कक व दाष्र्टांतिकांची भाषा पं डती वळणाची वाटते. एकाच ग्रंथात भाषेची ही तीन वळणे आढळून येण्याचा प्रकार काहीसा अपूर्वच म्हटला पाहिजे. त्यातिल पहिली दोन वळणे चक्रधरांच्या हातची असून तिसरे के षराजांचे आहे. त्यांतील फरक दोघांच्या शैलीत चांगलाच जाणवतो. सूत्रांची व दृष्टांताची भाषा चक्रधरी वळणाची, म्हणजे साधी, सोपी व सुटसुटीत असून के षराजांच्या दाष्र्टांतिकात त्यांनी मराठी भाषेला लावलेले पं डती वळण चांगलेच जाणवते. त्यांच्या भाषेत चक्रधरांच्या वाणीचा जिवंतपणा नसला तरी ती अंगच्या पां डत्याने व गांर्भीर्याने उठून दिसते. चक्रधरांचे तत्त्वज्ञान वद्वानांना रूचेल अशा रीतीने मराठीत मांडणे व अध्यात्मासारखे शास्त्र पेलण्यास समर्थ अशी शब्दसंपत्ती मराठी भाषेत रूढ करणे हे के षराजबासांचे माठे कार्य होय. या दृष्टीने ते प्राचीन मराठी गद्याचे आदय आचार्य शोभतात. शास्त्रीय परिभाषा मराठीत रूढ करूण स्वभाषेचे वाग्बल वाढ वण्याचे श्रेय के शराज बासांकडे जाते."[2] (पृ.क्र. **180** व **181**).

असा हा केसोबास ल खत 'दृष्टांतपाठ' हा ग्रंथ अनन्यसाधारण व अद् वतीय असा आहे. 'दृष्टांतपाठ' या अपूर्व ग्रंथाचे स्वरूप पाहिल्यावर त्यात आपल्याला सर्व गुणांचा समुच्चय झालेला दिसून येतो. या दृष्टांतपाठ ग्रंथावरून आपल्याला प्राचीन मराठी गद्याचे लौकीक व शास्त्रीय स्वरूप कळते. त्यामध्ये श्रीचक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान, तत्कालीन समाजजिवनाचे चत्रण, दृष्टांतातील भाषा सौदर्य वलास, समृध्द भाषाशैली, दृष्टांतसौदर्य अषा अनेक अपूर्व पैलूंचे एकत्रितपणे दर्षन घडते. अषा सर्व दृष्टींनी हा अपूर्व व अमोल असा ग्रंथ आहे. यादवकालीन मराठी गद्याच्या लौ कक, शास्त्रीय व पं डती वळनांचा तो प्रातिनि धक आहे. त्यामुळे केसोबासांचे हे कार्यकर्तृत्व अनेक दृष्टींनी मोलाचे ठरले आहे. 'दृष्टांतपाठ' हा ल लतवाङ्मय म्हणून निर्माण झालेला ग्रंथ नाही. तो तात्विक स्वरूपाचा ग्रंथ आहे. पण त्यातही आपल्या र सक वृत्तीने व पं डती वळणाने श्रीकेसोबासांनी भाषेचा वलास अलंकार, सौदर्य, समाजजिवनाचे यथार्थ दर्षन आपल्याला घड वलेले आहे. हा ग्रंथ मनोरंजनाचा नाही तर तो उध्दरणाचा ग्रंथ आहे. तेव्हा तो संपूर्णपणे आत्मसात करण्यासाठी अभ्यासक होऊनच वाचकाने पुढे सरसावले पाहिजे. तेव्हाच दृष्टांतपाठाचे खरे अंतरंग आपल्याला कळून येईल.

असा हा 'दृष्टांतपाठ' ग्रंथ हा केवळ तत्त्वज्ञानाचाच ग्रंथ नाही तर लोककथांचे ते पहिलेवहिले संकलनही आहे. त्यामुळे त्याला मनोरंजकता तर लाभलीच आहे. पण त्यातून उद्बोधनही होते. जनसामान्याचे सोप्यात सोप्या भाषेत अज्ञान दूर करणारा 'दृष्टांतपाठ' हा ग्रंथ ज्ञानग्रंथ होय. म्हणून 'दृष्टांतपाठा'चे मराठी वाङ्मयातील स्थान अनन्यासाधारण आहे.

## निष्कर्ष :

International Research Journal of Humanities, Language and Literature
Volume -1 Issue-2 (November 2014) ISSN (P): 2349-1612

1. मराठीतील पहिला चरित्रग्रंथ व आद्य गद्यग्रंथ म्हणून लीळाचरित्राचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. महानुभाव संप्रदायाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांच्या लीळा त्यांच्या शष्याने म्हणजे श्री म्हाइंभटांनी संक लत करून चरित्ररूपाने मांडल्या. हा 'लीळाचरित्र' ग्रंथ म्हणजे महानुभावीय वाङ्मय व तत्वज्ञानाचा मूलाधारच होय.
2. पुढे म्हाईभटांच्या लीळाचरित्रातील वचने म्हणजे सूत्रे एकत्रित करून श्री केसोबासांनी 'सूत्रपाठ' हा ग्रंथ सध्द् केला व दृष्टांत निवडून 'दृष्टांतपाठ' हा ग्रंथ सध्द् केला. सूत्रपाठाचा वषय तात्विक असला तरी त्यातील अनेक सूत्रे वाङ्मयीनदृष्टया खूप सुंदर व सहज झालेली आहेत. त्यामुळेच सूत्रपाठाचे मराठी वाङ्मयातील स्थान अद् वतीय आहे. या सूत्रांमध्ये अगदी कमी शब्दांत पुष्कळ अर्थ सांगण्याचे सामर्थ्य आहे. तसेच मनाची पकड घेऊन मनाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य या सर्व तात्विक सूत्रांमध्ये आहे.
3. प्रत्येक दृष्टान्ताचे तीन भाग पडतात. प्रथम श्रीचक्रधरोक्त सूत्र, नंतर त्या सूत्रातला वचार कंवा तत्त्व पट वणारा दृष्टांत आ ण शेवटी त्या दृष्टांतातून सूत्राषी सुसंगत असे काढलेले पारमा र्थक निष्कर्ष म्हणजे द्राष्टातीक असे आहेत. 'दृष्टांतपाठ' हा ग्रंथ सध्द् करतांना केसोबासांनी लीळाचरित्रातील श्रीचक्रधरोक्त सूत्रे व दृष्टांत निवडले व त्या दृष्टांतातून सू चत केलेले तत्त्व द्राष्टांतिक नावाने जोडले.
4. सूत्रपाठाचा आधार घेऊन महानुभाव साहित्यिकांनी व वध ग्रंथांची रचना केलेली आहे.
5. लीळाचरित्रात सर्वत्र अनेक वचने व दृष्टांत वखुरलेले होते. केसोबासांनी श्रीनागदेवाचार्यांची आज्ञा घेऊन त्यांचा अन्वय लावून 'सूत्रपाठ' व 'दृष्टांतपाठ' हे ग्रंथ संक लत केले.
6. काही दृष्टांत लीळाचरित्रात आलेले नाहीत ते स्वतः केसोबासांनी अनेक भक्तांना, षष्यांना वचारून दृष्टांतपाठात समा वष्ट केलेले आहे. तसेच त्या दृष्टांतावर स्वतःच्या द्राष्टांतिक टीकेची जोडही दिलेली आहे. यातून त्यांची वद्वत्ता दिसून येते.

## संदर्भ टिपा

1. महानुभाव पंथ आ ण त्याचे वाङ्मय, शं.गो. तुळपुळे, व्हीनस प्रकाशन: पुणे, आवृत्ति दुसरी **2004**, पृ.क्र. **179.**
2. तत्रैव पृ.क्र. **180** व **181.**

## संदर्भ ग्रंथ


1. सार्थ सूत्रपाठ - प्रथम भाग: महंत आराध्य मुरलीधरषास्त्री, प्रकाशक - महन्त आराध्य सन्तराज, महानुभाव कृष्ण मंदिर, म्युनि सपल पार्क भूसावळ, आवृत्ती पहिली, **1964.**

2. महानुभावांचा इतिहास: कै. मुरलीधर कोपळकर महानुभाव (उपाध्ये), महन्त श्री प्रभाकरबाबा संन्यासी महानुभाव, श्रीकृष्ण ज्ञानमंदीर, यवतमाळ, प्रथम आवृत्ती **1979.**

3. महानुभाव तत्वज्ञान: डॉ. श्री. व. भ. कोलते, अरूण प्रकाशन, मलकापूर, चवथी आवृत्ती **1975.**

4. लीळाचरित्र: श्री. शं.गो.तुळपुळे, सु वचार प्रकाशन मंडळ, नागपूर, प्रथम आवृत्ती, सप्टेंबर, **1967.**

5. लीळाचरित्र: म. वद्याधरदादा पंजाबी, महानुभाव सेवा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती.

6. लीळाचरित्र: श्री. पुरूषोत्तम नागपूरे, आवृत्ती पहिली.

7. लीळाचरित्र (एक अभ्यास): श्री.व.दि. कुलकर्णी, व्हीनस प्रकाषन, पुणे, प्रथम आवृत्ती, ए प्रल **1967.**

8. महानुभाव पंथ व त्याचे वाङ्मय: श्री. शं.गो. तुळपुळे, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती ऑगस्ट,**1976.**